साप्ताहिक

# हॅलो न्यूज

e-mail-hellonewskrd@gmail.com

HELLO NEWS

संपादक : विशाल वामन पाटील

❊ सातारा ❊ वर्ष १ ❊ अंक ३ ❊ मराठी ❊ सोमवार १५ जून ते २१ जून २०२६ ❊ PRGI. MHMAR/26/A3624 ❊ पाने ४ ❊ किंमत ३ रुपये

❊ Satara ❊ Year 1 ❊ Volume 3 ❊ Marathi ❊ Monday 15 Jun to 21 Jun 2026 ❊ PRGI. MHMAR/26/A3624 ❊ Page 4 ❊ Price 3 Rs.

## सातारा- सांगली महायुतीत धुसफूस : शिवसेना, राष्ट्रवादीची बैठकीकडे पाठ

**कराड (हॅलो न्यूज)**

महायुतीत समन्वयक बैठकीला राष्ट्रवादी, शिवसेनेची मंत्री, आमदार तसेच पदाधिकाऱ्यांनी दांडी मारल्याचे पहायला मिळाले. सातारा जिल्हा परिषदेतील झालेल्या अध्यक्ष पदाच्या राड्यानंतर आता शिवसेना, राष्ट्रवादी भाजपाला विधान परिषद निवडणुकीत खिंडीत पकडत असल्याचे पहायला मिळत आहे. महायुतीत समन्वय साधला न गेल्यास भाजपाला विधान परिषदेत मोठी किंमत मोजावी लागणार हे आजच्या बैठकीतून समोर आले आहे. सदरची बैठकी अवघ्या १० मिनिटांत आटोपती घेत प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, चंद्रकांत दादा पाटील तडकाफडकी बाहेर पडले. तर एकनाथ शिंदेचे आमदार महेश शिंदे मात्र बैठकीला हजर राहिल्याने आता राजकीय वातावरण आणखी तापणार हे मात्र नक्की.



महायुतीतील घटक पक्षाची कराड येथील हॉटेल फर्न येथे समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, भाजप जिल्हाध्यक्ष आ. अतुल भोसले, शिवसेना आ. महेश शिंदे, आ. मनोज घोरपडे, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ, माथाडी नेते नरेंद्र पाटील, आ. सदाभाऊ खोत, सुनिल काटकर, सातारा जिल्हा परिषद अध्यक्षा प्रियाताई शिंदे, उपाध्यक्ष राजू भोसले यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महायुती समन्वय बैठकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या १२ वर्षाच्या तपपूर्ती कामांची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषद झाली. या पत्रकार परिषदेत मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी शिवसेना आणि राष्ट्रवादी उपस्थित नाहीत. यावर शिवेंद्रराजेंनी सदरची समन्वय बैठक प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी बोलवली होती. अशी सारवासारव करत महायुतीत कुठली अडचण नसल्याचे म्हटले आहे.

सातारा- सांगली जिल्ह्यातून शक्तिपीठ महामार्ग जात असून त्याला विरोध करणाऱ्या काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादी भांडवल करत असून चांगला प्रकल्प आडवायच काम करत असल्याची टीका बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी कराड येथे केली आहे. सातारा जिल्ह्यातील माण- खटाव तसेच सांगली जिल्ह्यातील अनेक गावातून हा शक्तीपीठ महामार्गाला काही शेतकऱ्यांनी समर्थनाचे पत्रही दिल्याचे मंत्री शिवेंद्रराजेंनी सांगितले.

### उदयनराजे दिलखुलास हसले

महायुती समन्वय बैठकीनंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत लाईट गेली असता, पत्रकारांनी शिवेंद्रराजेंना प्रश्न विचारत असल्याने लाईट घालवली का असा प्रश्न करताच, डीपी लोड आला असल्याचे म्हणाले. मात्र, यावेळी पाठीमागे उभे असलेले खासदार छ. उदयनराजे भोसले यांनी दिलखुलास हास्य केल्याचे पहायला मिळाले.



## जम्मूतील उरीत स्फोटात साताऱ्याच्या सुपुत्राला वीरमरण

**सातारा(हॅलो न्यूज)**

शहीद जवान अर्जुन जाधव यांच्या पार्थिवावर आज शहापूर (ता. कराड) येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस दल व भारतीय सैन्य दलाच्या तुकडीने हवेत बंदुकींच्या फैरी झाडून तसेच अंतिम बिगुल वाजवून शहीद जवानास मानवंदना दिली. यावेळी आमदार मनोज घोरपडे, आमदार डॉ. अतुल भोसले, माजी आमदार बाळासाहेब पाटील, भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ, जिल्हा परिषद सदस्या विद्याताई वेताळ, निवास थोरात, हिंदकेसरी संतोष वेताळ, जिल्हाधिकारी संतोष पाटील, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ओमकार कापले, गटविकास अधिकारी प्रताप पाटील, पोलिस उपअधीक्षक राजश्री पाटील यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी शहीद जवान अर्जुन जाधव यांना पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना दिली.

यानंतर वीर पत्नी सायली, मुलगा सर्वेश, वीर पिता राजेंद्र, वीर माता सुरेखा, भाऊ ऋषिकेश, बहिणी रेश्मा चव्हाण पूनम पाटील यांनी अंतिम दर्शन घेतले. यानंतर शहीद अर्जुन जाधव यांच्या पार्थिवाला मुखअग्नी देऊन अंत्यसंस्कार केले. यावेळी लष्कराचे आजी, माजी अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.


जम्मू काश्मीरच्या उरी सेक्टरमध्ये कर्तव्य बजावत असताना जवान अर्जुन राजेंद्र जाधव (वय- ३०) यांना हॅन्ड ग्रॅनाईटच्या स्फोटात वीरमरण आले. लष्कराच्या बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपचे ते जवान होते .सध्या काश्मीरमध्ये ८ मध्ये कार्यरत होते. या महिन्यात २५ जून रोजी त्यांच्या मुलाचा पहिला वाढदिवस साजरा करण्यासाठी ते १५ जूनला सुट्टीवर येणार होते. त्या अगोदरच त्यांना वीरमरण आल्याने कुटुंबासह संपूर्ण शहापूर गावावर शोककळा पसरली होती.


## श्रध्दा आणि अंधश्रध्दा कोण पसरवत?

### डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि नरेंद्राचार्य महाराज यांच्यात झाली होती जुंगलबंदी

**विशाल पाटील**
**कराड (हॅलो न्यूज)**

आज २१ व्या शतकातही श्रध्देचा आणि अंधश्रध्देचा वाद पहायला मिळत आहे. अंधश्रध्दा निर्मूलन समितीचे डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि नाणीज मठाचे मठाधिपती जगद्गुरू अशी पदवी असलेले नरेंद्राचार्य महाराज यांच्यात एक जुंगलबंदी झाली होती. या जुंगलबंदीत कोण जिंकल कोण हारले यापेक्षा श्रध्दा आणि अंधश्रध्दा कोण पसरवत, याबाबत मोठे उदाहरण आहे. प्रत्येकाने या दोन्ही व्यक्तीच्या सवाल जवाब श्रध्दा आणि अंधश्रध्देतील फरक सांगत आहे. काय घडल होत या ठिकाणी याचाच जागर...





तारीख होती २५ सप्टेंबर १९९८ हा सामना झाला. तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाच्या मनात एक कुतुहल आणि उत्सुकता असल्याचे चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. एका व्यक्तीच्या आजूबाजूला त्यांच्या अनुयायांचा जमाव बसलेला होता आणि मग उभी असलेली व्यक्ती एका मागून एक प्रश्न विचारायला लागली. समोरची व्यक्ती न घाबरता त्याची उत्तर द्यायला लागली. यामधील एक व्यक्ती होती जगद्गुरु नरेंद्र महाराज आणि दुसरे होते महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोळकर. हा सामना होता समाजातील दोन विचारसरणींचा.

**(जागर..)**

एका बाजूला श्रद्धा भक्तीच प्रतीक आणि दुसऱ्या बाजूला विज्ञान विवेक आणि तर्कशक्तीचा पुरस्कर्ता हा सामना बघायला अनेक लोक जमले होते पण प्रश्न असा की २७ वर्षांपूर्वी झालेल्या या ऐतिहासिक युक्तिवादात खरंतर कोण जिंकलं आणि कोण हरलं आणि शेवटी निष्कर्ष काय निघाला होता.

प्रश्न क्र.१ - डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी नरेंद्र लीलामृत या पुस्तकात नरेंद्र महाराजांच्या पत्नी सुप्रिया सुर्वे यांनी प्रदर्शित केले आहे. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत असं म्हटलय की, नरेंद्र महाराज हे गजानन महाराजांचे अवतार आहेत, असा उल्लेख आहे. यासाठी नरेंद्र महाराज हे स्वतःला गजानन महाराजांचे अवतार मानतात का? हे सांगावं आणि शेगावच्या श्री गजानन संस्थानाने श्री गजानन महाराजांचा अवतार मानणारी व्यक्ती भोंदू आहे असं जाहीर केल. यावर नरेंद्र महाराजांनी आपलं मत द्यावं.या प्रश्नाला नरेंद्र महाराज उत्तर देतात की प्रश्न क्रमांक एक याच उत्तर असे की प्रकाशित केलेल्या पुस्तकात ट्रस्टचे अधिकृत मत नाही. शिवाय आम्ही स्वतःला गजानन महाराजांचे अवतार कधी समजतच नाही. तर गजानन महाराज संस्थानाने केलेला खुलासा त्यांचा वैयक्तिक खुलासा आहे. त्यावर माझं काहीच मत नाही.

प्रश्न क्र. २- डॉ. दाभोळकरांचा दुसरा प्रश्न - नरेंद्र महाराज लीलामृत या पुस्तकात १९ व्या अध्याय पान क्रमांक २०० मध्ये प्रथम आवृत्ती श्री राजाभाऊ लिमये यांच्या वहिनी माधवी मोहन लिमये यांना फटका मारला. त्यानंतर लगेचच त्यांच्या त्वचेवर पडलेले पांढरे डाग बरे झाले असा उल्लेख आहे. माधवी लिमये यांनी हा मजकूर पूर्ण खोटा असल्याचं भाषणात आणि लेखी निवेदनात जाहीर केले होते. तेव्हा नरेंद्र महाराजांनी खोटा दावा का केला आणि एखाद्या व्यक्तीला असं फटका मारणं योग्य आहे का? त्यावर महाराज उत्तर देतात, की मी चमत्कार करतो असा दावा कधीच केलेला नाही. मी लिमये वहिणींना कधी फटकाही मारलेला नाही. लीलामृत हे लोकांना आलेल्या अनुभूतीचे कथानक आहे.

प्रश्न क्र. ३- डॉ. दाभोळकर पुढे प्रश्न करतात की लीलामृतात पांडुरंग पेंढारी यांची वहिनी आणि सुभाष कदम यांचे नातेबाईक मृत झाल्यानंतर महाराजांनी त्यांना पुन्हा जिवंत केल्याचा उल्लेख आहे. त्याबद्दल लीलामृतात म्हटलंय की डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत जाहीर केलं होतं. मात्र महाराजांनी पुन्हा त्यांना जिवंत केलं. आता याबाबतचा कोणताही पुरावा समितीने वारंवार मागूनही त्यांना देण्यात आलेला नाही. जर या बैठकीत महाराजांनी पुरावा दिला नाही. तर त्यांचा हा दावा खोटा ठरवण्यात येईल. यावर नरेंद्र महाराज यांचं काय म्हणणं आहे. दाभोळकरांच्या प्रश्नावर महाराज म्हणाले, की हा दावा आम्ही केलेला नसून त्याबद्दल पुरावा देण्याचा प्रश्नच येत नाही.

प्रश्न क्र.४- डॉ. नरेंद्र दाभोळकर प्रश्न करतात की काही भक्तांच्या डोक्यावरचे गेलेले केस सुद्धा महाराजांनी परत आणलेत हे सुद्धा लीलामृतात म्हटलंय. आता याबाबत आम्ही नरेंद्र महाराजांना टक्कल पडलेली माणसं देऊ इच्छितो आणि त्यांना त्यांच्या डोक्यावर केस आणून दाखवावे. जर केस आले तर अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराजांच शिष्यस्तव पत्करेल पण जर तसं झालं नाही. तर महाराजांनी लोकांची दिशाभूल केल्याबद्दल माफी मागावी. यानंतर नरेंद्र महाराज थोडं हसत म्हणाले, हे वारंवार त्याच प्रकारचे प्रश्न विचारले जातात मी कधीच चमत्कार केल्याचा दावा केलेला नाही. हे दावे माझे नसून भक्तांचे आहेत, म्हणून मी कुठलीही माफी मागणार नाही.

संपादकीय

# शाळेत पैसा बाजार एकाच छताखाली

जून महिना म्हटलं की पालकांपुढे अर्थिक संकट उभ राहतं. आपल्या पोरांच्या भविष्यासाठी मार्चच्या अर्थिक वर्षाची तुलना याठिकाणी कोणताच पालक करत नाही. कारण मुलाच्या- मुलींच्या भविष्याचा वेध घेवून ती गुंतवणूक, करिअर अस म्हणतं पैशाची जुळवाजुळव करतो. १५- २० वर्षापूर्वी केवळ शाळेला जाण्यासाठी गणवेश, पुस्तके आणि १०-१२ वह्या या दहावीच्या विद्यार्थ्यासाठी एक- दोन हजार रूपयांचा खर्च म्हणजे खूप मोठा होत असे. प्राथमिक शाळांत एका पिशवीत सर्व काही बसत असे. शासनाने मुलांवरील दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्या केल्या. मात्र, आताची प्रामुख्याने इंग्रजी, सेमी इंग्रजी आणि ॲकडमीवाले जास्त पुस्तके, गाईड्स आणि रफ, टफ नोटबुक खरेदीचा मारा करत आहेत. बरं, हे सर्व घ्यायचे ते कोठून तर एकाच छताखाली या वाक्याने संस्थांनी शाळेत बाजार मांडून पैसा कमावण्यास सुरूवात केली आहे. याविरोधात साहजिकच शालेय साहित्य विक्रेते रस्त्यावर उतरू लागले आहेत, परंतु त्याच्या मागणीला, आंदोलनाला सध्यातरी मोठे यश दिसताना दिसत नाही. तर दुसरीकडे भरभक्कम पैशाच्या संस्थानी न जुमानता शाळेत शिक्षणाचा बाजार मांडला आहेच, त्यासोबत गणवेश, पुस्तक आणि वह्या खरेदीचा भरमसाठ किंमतीने धंदा मांडला आहे.

राज्यासह ग्रामीण भागात हे शाळेतच किंवा आम्ही सांगतोय त्याच एका दुकानात खरेदीचं पेव फुटले आहे. एक चांगली गोष्ट पालकांना वाटते, ती म्हणजे एकाच छताखाली, एकाच ठिकाणी सर्वकाही मिळतेय. परंतु, जो दुकानदारांनी आरोप केला आहे. एमआरपी किंमतीने पुस्तके, वह्या विकल्या जातात किंवा त्यापेक्षा जास्त दराने यांचा विचार पालक करत नाही का तर करतो पण मुलांचे शिक्षण संस्थेने थांबवायला नको, मुलांच्याकडे पहिल्याच दिवसापासून शिक्षकाने, संस्थेने पूर्वग्रह दूषित होवून पाहू नये. यासाठी पालक शांत बसत आहे. त्यामुळे शिक्षणाचा बाजार जोमात सुरू आहे. या बाजारात पालक भरडला जात आहे, दुकानदाराचा व्यावसाय अडचणीत येत आहे. शिक्षक शिक्षण सोडून शालेय विक्रीचा धंदा करत आहे. संस्था चालक पैसा कमवून बसत आहे.

संस्थेत होत असलेली शालेय साहित्य विक्रीत जास्त दराने विक्रीचा मुद्दा आहे किंवा एमआरपीने विक्री केला जात असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे आम्ही जादा पैसे घेत नसल्याचेही सांगितले जाते. परंतु, साहित्य विकणारा दुकानदारांच्यात स्पर्धा होत असल्याने एमआरपीमध्ये जो फायदा असतो. त्यात दुकानदार कमी करून देत असल्याने शालेय साहित्य कमी किंमतीत मिळते, ते कोणीही नाकारू शकत नाही. काही साहित्य एमआरपीला मिळत असेल परंतु, एमआरपीपेक्षा जादा दराने मिळत नाही. परंतु, संस्थांना कोण विचारणार तसेच संस्थाचे दर ठरतात, ते पालकांना भरने बंधनकारक असते. तेव्हा शाळेतील शिक्षणाचा बाजार मोठमोठ्या प्रवेश फी, वार्षिक फी, गॅदरिंग फी, ट्रीफ फी, कॉम्पिटीश फी, बस फी, एक्स्ट्रा फी घेतली जात आहेच. आता त्यात आणखी शालेय साहित्यांची जादा (एक्स्ट्रा) दराने विकून संस्थांनी शाळा ज्ञान घेण्या अगोदर पैसा कमविण्याच साधन बनवलं असल्याचा आता शिक्कामोर्तब होवू लागल आहे. काही संस्थांनी गणवेश, बूट, स्वेटर, कॅप या सुध्दा गोष्टीसाठी संस्थेची गोडावून, दुकाने थाटली आहेत. त्यासाठी कर्मचारी सुध्दा नेमले आहेत. तेव्हा यावर शिक्षण विभाग हाताची घडी घालून बसले असून तोंडावरच नव्हे तर कानावरही बोट ठेवून अंधळे असल्याची भूमिका घेत असल्याने शिक्षणाचा बाजार थाटात मांडला जावू लागला आहे. यावर आता शिक्षण मंत्र्यांनी लक्ष घालावे अन्यथा गोरगरिब यापुढील काळात शिक्षणापासून वंचित राहील अन् शिक्षणातील सुशिक्षित- असुशिक्षित अशी दरी वाढेल, हे नक्की.

# सातारा व वाई येथील शासकीय विश्रामगृहात प्रवेश घेण्याचे आवाहन

**सातारा, जिमाका**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत सातारा येथील क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतीगृह वाई व सातारा येथे शासकीय वसतीगृह कार्यरत आहे. सदर वसतीगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, खेळाचे साहित्य इ. सोयी सुविधा मोफत पुरवल्या जातात.सदर वसतिगृहामध्ये शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग, खुला, अपंग, अनाथ प्रवर्गनिहाय प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतीगृहातील रिक्त जागेवर इयत्ता ८ वी ते १० वी व ११ वी, तसेच प्रथम वर्ष आणि पदवीत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यालय व महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाच्या प्रवेश प्रक्रिया ऑफलाईन/ऑनलाईन पद्धतीने सुरु असून विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्ज भरुन घेण्यात येणार आहेत.

अधिक माहितीसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, यशवंत नगर सोनगीरवाडी वाई व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह, ४०९/९ ब सदर बझार, सातारा येथे संपर्क साधावा, असे आवाहन वसतिगृहाच्या गृहपालांनी केले आहे.

# कोयना नदीत सहा दिवसात चौघांचा बुडून मृत्यू

**कराड (हॅलो न्यूज)**

साताऱ्यातील कोयना नदीत आपल्या वयोवृध्द आजोबा सोबत पोहण्यासाठी गेलेल्या एका १२ वर्षाच्या मुलचा बुडाल्याची घटना समोर आली असून मुलाचा मृत्यू झाला आहे. कराड तालुक्यातील सुपने गावातील आजोबा आपल्या नातवाला कोयना नदीत आज सकाळी पोहण्यासाठी घेवून गेले होते. तेव्हा ही दुर्घटना घडली. कोयना नदीत गेल्या सहा दिवसातील तिसरी घटना चौघांचा मृत्यू झाला आहे.



सुपने - किरपे पुलाच्या दरम्यान वाहणाऱ्या कोयना नदीच्या पाण्याच्या पात्रात आज सकाळी नातू वरद शंकर कांबळे आपल्या आजोबासोबत पोहायला गेलेला होता. यावेळी आजोबा बंडू खाशाबा कांबळे नदीकाठाला बसून होते. यावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने नातू पाण्यात बुडू लागला तेव्हा पुलावरून प्रवास करणाऱ्या एका व्यक्तीला मुलगा बुडत असल्याचे लक्षात आले. तेव्हा त्या व्यक्तीने मोठमोठ्याने आरडोओरड केली. यावेळी नदीपात्रात पोहणाऱ्या तसेच शेजारी असणाऱ्या तरूणांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. मात्र, आजोबांच्या डोळ्यासमोर नातू बुडाला. काही वेळातच गावातील तरूणांनी नदीपात्रात शोधमोहिम राबविली.

या शोधकार्यात सुपने गावचे पोलिस पाटील कमलेश कोळी यांनी नदीत स्वतः उडी घेत शोधकार्यात सहभाग घेतला, तेव्हा त्यांना मुलगा सापडला. तसेच जमीर शौकात, लखन पठाण, अमोल हंबीरराव पाटील यांनीही नदीत उड्या घेवून शोधकार्य केले. घटनेचा अधिक तपास कराड तालुका पोलिस करीत आहेत. सहा दिवसापूर्वी कोयना धरणाजवळ कोयना नदीत दोन सख्या चुलत भावांचा बुडून मृत्यू झाला होता. त्यानंतर दोन दिवसापूर्वी पाटण तालुक्यातील निसरे बंधारा येथे १२ वर्षाचा मुलाचा पोहताना मृत्यू झाला. तर आज कराड तालुक्यातील सुपने येथे १२ वर्षाचाच मुलाचा बुडून मृत्यू झाला आहे.

# तेलबिया अंतर्गत गोदाम बांधकाम, मिनी ऑइल मिल व कडधान्य प्रक्रिया युनिट स्थापनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सातारा, जिमाका**

कृषी विभागामार्फत सन २०२६-२७ मध्ये राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया योजने मधून फ्लेक्झी घटक बाबी अंतर्गत गोदाम बांधकाम, मिनी ऑइल मिल/ एक्सपेलर फिल्टर प्रेस सह व शिवाय या बाबी साठी अर्ज मागविणेत येत आहेत. ज्या ठिकाणी गोदामाची व मिनी ऑइल मिल सोय नाही अशा परिसरात गळीत धान्य पिके घेतली जातात अशा ठिकाणी गोदाम बांधकाम व मिनी ऑइल मिल/ एक्सपेलर फिल्टर प्रेस सह व शिवाय कार्यक्रमाचा जिल्हयासाठी लक्षांक प्राप्त झाले आहे. त्यासाठी खालील बाबींसाठी पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मागविण्यात येत आहे.

गोदाम :- क्षमता- २५० मे.टन अनुदान गोदाम बांधकाम करण्यासाठी रु. २८.८०२५० लाख (प्रति टन रु. ११५२१/-) प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा रु. १४.४० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान अनुज्ञेय राहील. सदर बाब बँककर्जाशी निगडीत असून इच्छूक अर्जदाराने (सरकारी/खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था/कंपनी/ आणि सहकारी संस्था) केंद्र शासनाच्या / वखार महामंडळ यांचे मार्गदर्शक सूचनांनुसार बँकेकडे प्रकल्प सादर करावा. बँकेनेकर्ज मंजुर केल्यानंतर संबंधित अर्जदार सदर बाबीच्या लाभास पात्र राहील. अर्ज तालुका कृषी अधिकारी कार्यालयाकडे दि. ३० जुलै अखरे सादर करावयाचे आहे.

मिनी ऑइल मिल / एक्सपेलर फिल्टर प्रेस सह उच्चतम अनुदान मर्यादा रु. ४ लाख प्रती युनिट, प्रवर्गानिहाय अनुदान -

मिनी ऑइल मिल / एक्सपेलर फिल्टर प्रेस शिवाय उच्चतम अनुदान मर्यादा रु. ३ लाख प्रती युनिट,

अजा/अज/अल्प/सिमांत/महिला- युनिटच्या किंमतीच्या ५०% किंवा सदर युनिटसाठी निर्धारित उच्चतम मर्यादत. सर्वसाधारण प्रवर्ग युनिटच्या किंमतीच्या ४०% किंवा सदर युनिटसाठी निर्धारित उच्चतम मर्यादेत.अर्ज हा महाडिबीटी प्रणालीवर करण्यात यावा. तसेच या घटकासाठी प्राधान्याने / यांना नंतर लक्षांक शिल्लक राहिल्यास वैयक्तिक लाभार्थ्यांना लाभ देण्यात येईल.

वरील सर्व बाबींसाठीचे अर्ज संबंधित तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयामार्फत सादर करावेत. लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास लॉटरी पध्दतीने लाभार्थीनिवड करणेत येईल.

# कराडात चार लाखाचा चौदा किलो गांजा जप्त

## एकास अटक; उपअधीक्षक कार्यालय, शहर पोलिसांची संयुक्त कारवाई

**कराड (हॅलो न्यूज)**

येथील पोलीस उपअधिक्षक कार्यालयाचे विशेष पथक आणि शहर पोलीस ठाण्याच्या पथकाने छापा टाकून तब्बल ४ लाख रुपये किमतीचा १४ किलो गांजा जप्त केला. सैदापूर, ता. कराड येथील कॅनॉल परिसरात सोमवारी रात्री ही कारवाई करण्यात आली.

याप्रकरणी गोरख जिजाबा पवार (रा. वडोली निळेश्वर, ता. कराड, सध्या रा. एसजीएम कॉलेजमागे, साई हाइट्स, प्रथमेश कॉलनी, विद्यानगर, सैदापूर) याला पोलिसांनी अटक केले आहे. पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अप्पर अधीक्षक वैशाली कडूकर यांनी जिल्ह्यात अंमली पदार्थविरोधी मोहीम अधिक प्रभावी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार कराडच्या पोलीस उपअधीक्षक राजश्री पाटील यांनी अधिकाऱ्यांना अंमली पदार्थांबाबत विशेष कारवाई करण्याबाबत सूचित केले होते. सोमवारी रात्री उपअधीक्षक राजश्री पाटील यांना मिळालेल्या माहितीनुसार, सैदापूर येथे कॅनॉल परिसरात एकजण गांजा विक्रीसाठी येणार असल्याचे समजले. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक भापकर यांच्या नेतृत्वाखाली हवालदार असिफ जमादार, प्रवीण पवार,



सागर बर्गे, दीपक कोळी, मयूर देशमुख, हर्षल साळुंखे, महेश शिंदे व महेश पवार यांच्या पथकाने सापळा रचला. कॅनॉल परिसरात गोरख पवार हा विक्री करण्याच्या उद्देशाने गांजाची वाहतूक करताना आढळून आला. पोलिसांनी त्याच्याकडून १ लाख ९९ हजार १७५ रुपये किमतीचा सहा किलो गांजा तसेच दुचाकी जप्त केली.

याबाबत हवालदार सागर बर्गे यांनी कराड शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक भापकर यांच्यासह उपअधीक्षक कार्यालयाच्या विशेष पथकाने आरोपीकडे अधिक तपास केला असता त्याच्याकडे आणखी २ लाख रुपये किमतीचा ८ किलो गांचा आढळून आला. तो जप्त करण्यात आला आहे. या गुन्ह्यात आणखी आरोपींना अटक होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक भापकर तपास करीत आहेत.

* Satara * Vol- 3 * Isshu- 1 * Marathi * Weklly * Page- 4 * Prise Rs- 3/- * PRGI. MHMAR/26/A3624

साप्ताहिक हॅलो न्यूज (PRGI. MHMAR/26/A3624) हे मराठी पत्रक मालक, प्रकाशक, संपादक विशाल वामन पाटील यांनी मुद्रक सचिन काशिनाथ पाटील यांच्या राजमुद्रा ऑफसेट, २३३, सूर्या कॉम्प्लेक्स कराड, जि. सातारा येथे छापून (मुद्रीत) साप्ताहिक हॅलो न्यूज मुख्य कार्यालय २०६/१, वार्ड नं- ४, मु. पो तांबवे, ता. कराड, जि. सातारा ४१५११४ येथून प्रकाशित केला. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास कराड न्यायालया अंतर्गत)

Weekly Hello News publisher, Owner and Editor By Vishal Vaman patil has Printed Sachin kashinath Patil, Rajmudra offset, 233, Surya complex karad, Dist - Satara At published weekly Hello News Head office 206/1 ward no -4, At - Post Tambave, Tal - karad, Dist - Satara 415114

# उंडाळकर-भोसले गट जिल्हा बँक, बाजार समितीत कायम सोबत राहणार : डॉ. सुरेश भोसले

## विरोधकांनी कारखान्यात महाराष्ट्रातील सर्वात मोठा घोटाळा केला

**कराड (हॅलो न्यूज)**

उंडाळकर - भोसले गट एकत्र आहे, हे आमचे भाग्य आहे. एक निवडणूक सोडली तर उंडाळकर- भोसले एकत्र आहेत. विलासराव पाटील (काका) आणि जयवंतराव भोसले (आप्पा) कायम शेवटपर्यंत सोबत राहिले. विचाराने आम्ही एकत्र होतो, त्यामुळे आम्ही कायम एकत्रच आहोत. बाजार समिती, जिल्हा बँकेत आमचे सहकार्य कायम राहील. ही तडजोड नाही तर भागाच्या विकास होत राहणे महत्वाचे आहे. भोसले - मोहिते २०१० साली एकत्र आले, तेव्हा विरोधक केवळ विलासराव पाटील (काका) यांच्यामुळे सत्तेत काही लोक आले. मात्र, सहकारी संस्थात होवू नये, असे बदल झाले. महाराष्ट्राच्या कारखानादारीतील सर्वात मोठा ६० कोटींचा घोटाळा झाला, असल्याचा आरोप कारखान्याचे सहकार पॅनेलचे प्रमुख डॉ. सुरेश भोसले यांनी विरोधकांवर केला.

कार्वे (ता. कराड) येथे आयोजित रयत संघटना व कृष्णा कारखाना सभासदांच्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी रयत संघटनेचे नेते अँड. उदयसिंह पाटील - उंडाळकर, वडगांवचे डॉ. सुधीर जगताप, प्रा. धनाजी काटकर, पंचायत समितीचे सदस्य नितीन थोरात, कोयना दूध संघाचे व्हाईस चेअरमन शिवाजीराव जाधव, माजी सभापती प्रदीप थोरात, राजू मुल्ला, बापूसाहेब सांळुखे यांच्यासह शेतकरी सभासद उपस्थित होते.



डॉ. सुरेश भोसले म्हणाले, उंडाळकर - भोसले गट एकत्र आहे, हे आमचे भाग्य आहे. यशवंतराव चव्हाण साहेब म्हणायचे स्वातंत्र्याची लढाई अवघड होती, तशीच लोकांची आर्थिक, सामाजिक उभारणी ही लढाई सुध्दा साधी नव्हती. सहकाराचा विचार अंगी जडल्याने आम्ही इथे एकत्र आलो. आमच्यातील संघर्ष थांबला आणि संस्थाचा विकास झाला. एक निवडणूक सोडली तर उंडाळकर- भोसले एकत्र आहेत. विलासराव पाटील (काका) आणि जयवंतराव भोसले (आप्पा) कायम शेवटपर्यंत सोबत राहिले. विचाराने आम्ही एकत्र होतो, त्यामुळे आम्ही कायम एकत्रच आहोत. बाजार समिती, जिल्हा बँकेत आमचे सहकार्य कायम राहील. ही तडजोड नाही तर भागाच्या विकास होत राहणे महत्वाचे आहे. भोसले - मोहिते २०१० साली एकत्र आले, तेव्हा विरोधक केवळ विलासराव पाटील (काका) यांच्यामुळे सत्तेत काही लोक आले. मात्र, सहकारी संस्थात होवू नये, असे बदल झाले. महाराष्ट्राच्या कारखानादारीतील सर्वात मोठा ६० कोटींचा घोटाळा झाला. एक दोन नव्हे तर ७७८ लोकांच्या नावावर खोट्या सह्या घेऊन घोटाळा झाला अन् कोणाच्यातरी सल्ल्याने हा कारखाना चालवला जात होते. कृष्णा कारखान्याच्या चेअरमनला जेलमध्ये जावे लागते, यामुळे कृष्णा कारखान्याची बदनामी झाली काळ डाग लागला. अविनाश मोहिते यांच्या काळात १४०० कामगाराचं रेकॉर्ड नसललेल्या कामगारांना महिन्याला ५० लाख रूपये दिले जात होते. त्यामुळे सहकार पॅनेलची सत्ता आली. तेव्हा कारखाना चालवायला पैसे नव्हते. शेवटी उधारीवर कारखाना चालवला. उंडाळकर - भोसले पॅटर्न लोकांनी मान्य केला आहे. सहकार संघर्षातून नव्हे सहकार्याने पुढे संस्था चालल्या आहेत.

अँड. उदयसिंह पाटील - उंडाळकर म्हणाले, रयत संघटना आणि कृष्णा उद्योग समुहाने सहकारात ३५ वर्ष काम केले. या बदलत्या समीकरणात आपण एकत्र आले पाहिजे, हे कार्यकर्त्यांनी मांडले. कोट्यावधीची इंडस्ट्री उभी करायची असेल तर सहकारात एकत्र पाहिजे. आम्ही महायुती म्हणून एकाच ठिकाणी आहोत. शेतकरी सभासद टिकला पाहिजे, यासाठी सहकारातील कारखान्यानी बँकाची कर्ज घेऊन चालवले आहेत. प्रत्येक वेळी विरोधला विरोध करून चालत नाही. सहकार सक्षम केल्याशिवाय काम करण सोप नाही. आपल्या विचारांची लोक आहेत, त्यांनी सहकार पॅनेलला मतदान करायला लावा. आपण सहकार सोबत आहोत, विजय निश्चित आहे केवळ मताधिक्य वाढण्यसाठी प्रत्येक मतदार मतदान केंद्रावर नेण्याची जबाबदारी पार पाडावी.

# अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत समर्थ पॅनेल विजयी

## कलादिग्दर्शक विभागातून वासू पाटील विजयी : प्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्याकडून सत्कार

**कराड (हॅलो न्यूज)**

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या २०२६ ते २०३१ संचालक मंडळाच्या निवडणुकीत माजी अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांच्या समर्थ पॅनलने सर्वच्या सर्व १४ जागांवर विजय मिळवला आहे. या संचालक मंडळात कराड तालुक्यातील वसंतगड येथील प्रवीण उर्फ वासू पाटील यांनी कलादिग्दर्शक विभागातून तब्बल ८८५ मत घेऊन संचालक मंडळात ३० वर्ष संचालक असलेल्या प्रसिद्ध कलादिग्दर्शक सतीश बिडकर यांचा पराभव केला. कलादिग्दर्शक वासू पाटील यांच्या या विजयानंतर प्रसिध्द गायक आनंद शिंदे सहकुटुंब वसंतगड येथील निवासस्थानी भेट देवून सत्कार केला.




वासू पाटील यांच्या विजयासाठी रोहित चव्हाण, संजय पाटील, जुगल किशोर ओझा, साताऱ्याचे दीपक देशमुख, संदीप भाऊ शिंदे यांच्यासह अनेकांनी मदत केली. वासू पाटील यांच्या विजयाबद्दल सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील, कराडचे लोकनियुक्त नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, रिल स्टार रवि सुर्यवंशी, दिपक शिंदे, प्रसाद देशपांडे, श्री. गिरी, ग्रामसेवक प्रमोद ठोके, अभियंता प्रवीण चिंचकर, कराड उत्तर बांधकाम अभियंता प्रविण कोकरे, सामाजिक कार्यकर्ते सुनील बामणे यांच्यासह राज्यातील अनेक रंगकर्मी, राजकीय, सामाजिक हिंतचिंतकांनी शुभेच्छा देवून अभिनंदन केले.

# जयवंत कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन विभागास सुरवात; पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश सुरू

**रेठरे (हॅलो न्यूज)**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ, रेठरे बुद्रुक यांचे जयवंत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक, जयवंतनगर, किल्ले मच्छिंद्रगड येथे अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना आणि पालकांना मार्गदर्शन देण्यासाठी विशेष प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन विभाग सुरू करण्यात आला आहे. या केंद्राद्वारे पात्र विद्यार्थ्यांना डिग्री प्रोव्हिजनल (अस्थायी) आणि डिप्लोमा नियमित प्रवेशाची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार असल्याची माहिती प्राचार्य डॉ. अनंतकुमार गुजर यांनी दिली.



संस्थेचे प्रधान सल्लागार प्रा. डॉ. विनोद बाबर म्हणाले, संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेशबाबा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पश्चिम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंगचे अद्यावत शिक्षण मिळावे यासाठी अघावत व सुसज्य असे इंजिनिअरिंग शिक्षण संकुल उभे आहे. अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना आणि पालकांना मार्गदर्शन देण्यासाठी विशेष प्रवेश प्रक्रिया मार्गदर्शन विभाग सुरू करण्यात आला आहे.

बारावी सायन्स उत्तीर्ण केल्यानंतर प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी आणि डिप्लोमा उत्तीर्ण किंवा बी.एस्सी.(मॅथेमॅटिक) पूर्ण केल्यावर थेट द्वितीय वर्ष इंजिनिअरिंग प्रवेशासाठी विद्यार्थी पात्र ठरतात, असे मार्गदर्शन केंद्रातून समजावण्यात आले. महाविद्यालयीन वेळेत कार्यरत असलेल्या या केंद्राचा फायदा विद्यार्थी व पालकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

महाविद्यालयाशी संपर्क क्रमांक : ९०११५५२२९६ / ८८३०५७०७८० व मार्गदर्शनासाठी विद्यार्थी व पालक केंद्राच्या कार्यक्षम वेळेत सकाळी ०९.०० ते सायं. ०५.३० वेळेत भेट देऊ शकतात, असे सूचित करण्यात आले आहे.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त घोलपवाडी, शामगावात वृक्षारोपण

## भाजप किसान मोर्चा अध्यक्ष रामकृष्ण वेताळांचे मार्गदर्शन

**कराड (हॅलो न्यूज)**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रत्यक्ष कृतीला प्राधान्य देत भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रामकृष्ण वेताळ यांनी घोलपवाडी व शामगाव येथे वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. पर्यावरणाचे महत्त्व केवळ भाषणांमधून न सांगता प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देण्याचा आदर्श त्यांनी यावेळी घालून दिला. पाच जून हा दिवस संपूर्ण जगभर जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. वाढते तापमान, पावसाची अनियमितता, जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरणीय असमतोल यांसारख्या गंभीर समस्यांवर



वृक्षारोपण हा प्रभावी उपाय असल्याचे रामकृष्ण वेताळ यांनी यावेळी सांगितले. पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेऊन अधिकाधिक वृक्ष लागवड करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

या उपक्रमात रघुनाथ शेंडगे, अमित पाटील, शशिकांत घोलप, गोरख पवार, पांडुरंग घोलप, संपत जाधव, रमेश जाधव, उपसरपंच बाळासाहेब पोळ, ग्रामपंचायत सदस्य राहुल यादव संतोष कणसे, कृष्णत पोळ, बाबुराव पोळ (चेअरमन), विजय पोळ, सचिन डांगे, अमोल डांगे, संभाजी पोळ, उद्धव पोळ, तेजस पोळ यांच्यासह घोलपवाडी व शामगाव परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वृक्षारोपण कार्यक्रमादरम्यान त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून दिले. रासायनिक शेतीमुळे पर्यावरण आणि मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता सेंद्रिय शेतीचा स्वीकार करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**वृक्ष लागवड व सेंद्रिय शेतीसाठी प्रयत्नशील**

वाढत्या तापमानवाढीतून सुटका मिळवण्यासाठी तसेच आरोग्यदायी जीवनशैली निर्माण करण्यासाठी वृक्ष लागवड आणि सेंद्रिय शेती हाच प्रभावी पर्याय आहे. त्यामुळे लोकांची मानसिकता बदलून या दोन्ही उपक्रमांचा व्यापक प्रसार करण्यासाठी वर्षभर कार्यरत राहणार आहे. पर्यावरण संवर्धनाबरोबरच लोकांचे आरोग्य सुधारावे हेच आमचे ध्येय आहे.

**- रामकृष्ण वेताळ**
**प्रदेशाध्यक्ष, भाजपा किसान मोर्चा महाराष्ट्र**

# कोयना जलाशयातील पाणीसाठ्यात घट

## पावसाची डेडलाईन उलटून गेली तरी पावसाचा पत्ता नाही : शेतकरी चिंताग्रस्त





**पाटण (हॅलो न्यूज)**
उन्हाची तीव्रता काही कमी होताना दिसत नाही. पायथा वीजगृहातून एका युनिटद्वारे वीजनिर्मितीनंतर १ हजार ५० क्युसेक्स पाण्याचा विसर्ग कोयना नदीपात्रात सुरूच आहे. तर महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी कोयना धरणाच्या छ. शिवाजी महाराज कोयना जलाशयातील पाणीसाठा मात्र दिवसेंदिवस कमीच होताना दिसत आहे. सध्या धरणात उपलब्ध १४.५४ टीएमसीपैकी ५ टीएमसी मृत व उपयुक्त अवघा ९.४२ टीएमसी पाणीसाठा शिल्लक आहे. पाणीसाठी मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने पायथा वीजगृह वगळता इतर ठिकाणची वीजनिर्मिती बंद करण्यात आली आहे. ७ जून पावसाची डेडलाईन उलटून गेली तरी पावसाचा पत्ता नाही. धरणातील पाण्याचा खडखडाट पाहता कोयना धरणाच्या छ. शिवाजी महाराज जलाशयाला दमदार पावसाची प्रतिक्षा आहे.

१०५.२५ टीएमसी पाणीसाठा क्षमता असणारे धरण हे सिंचनाबरोबरच वीजनिर्मितीमुळे महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी ठरले आहे. शिवाय कर्नाटक, आंध्रप्रदेश या राज्यांची तहान देखील कोयनेच्या पाण्यावरच भागवली जाते. कोयना धरण पूर्ण भरले की संपूर्ण राज्याची चिंता मिटते. मात्र गेल्या वर्षभरात सिंचनाबरोबरच अखंडीत वीजनिर्मिती आणि पिण्याच्या पाण्याची मागणी यामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याचा खडखडाट झाला असून पाणीसाठ्याने तळ गाठला आहे. नवजा येथील टॉवरही उघडा पडला आहे. त्यातच मान्सून लांबणीवर पडला तर सिंचनाबरोबरच वीजनिर्मितीचा प्रश्न गंभीर बनणार आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष कोयना धरणाकडे लागले आहे.

१ जून ते ३१ मे हे कोयना धरणाचे जलवर्ष म्हणून ओळखले जाते. या वर्षभरात झालेला पाऊस, पाणीसाठा यावर सिंचनाबरोबरच वीजनिर्मिती अवलंबून असते. यावर्षी धरणातील पाणीसाठ्याने चिंताजनक तळ गाठला आहे.

# आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते कराडमध्ये भव्य महाआरती

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक काळ देशाच्या पंतप्रधानपदी राहण्याचा ऐतिहासिक विक्रम



**कराड (हॅलो न्यूज)**
भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वाधिक काळ देशाच्या पंतप्रधानपदी राहण्याचा ऐतिहासिक विक्रम केल्याबद्दल, भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या हस्ते कराडमध्ये भव्य महाआरती करण्यात आली. कार्वे नाका परिसरातील श्री स्वामी समर्थ केंद्रात भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ही महाआरती उत्साहात संपन्न झाली.

यावेळी बोलताना आ.डॉ. भोसले म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीसाठी, स्थैर्यासाठी आणि उन्नतीसाठी गेल्या १२ वर्षात महत्त्वपूर्ण पावले टाकण्याचे काम झाले आहे. दिल्लीतील राजपथला कर्तव्यपथ बनवण्याचे काम मोदीजींच्या माध्यमातून झाले. तसेच देशाची अंतर्गत सुरक्षा जपण्यासाठी त्यांनी संरक्षण दलाला मोठी ऊर्जा दिली आहे. देशाला आत्मनिर्धार करण्याचे काम मोदीजींच्या माध्यमातून झाले आहे.

यावेळी माजी आमदार आनंदराव पाटील, कराडचे विरोधी पक्षनेते विजय वाटेगावकर, नगरसेवक सुहास जगताप, शिवाजी पवार, आशुतोष डुबल, माजी नगराध्यक्ष रोहिणी शिंदे, भाजपाच्या शहराध्यक्ष सुषमा लोखंडे, स्मिता हुलवान, गिरीश शहा, रमेश मोहिते, उमेश शिंदे यांच्यासह पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# कराड तालुक्यातील ४० गावांची आरोग्य सेवा 'सलाईन'वर...

## तेरा उपकेंद्र डॉक्टरांविना




**कराड (हॅलो न्यूज)**
प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्र ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचा कणा आहेत. या केंद्रांच्या माध्यमातूनच ग्रामीण भागाला आरोग्य सुविधा पुरविली जाते. मात्र, कराड तालुक्यातील चाळीसपेक्षा जास्त गावातील आरोग्यसेवा सध्या 'सलाईन'वर आहे. तेरा उपकेंद्रात समुदाय आरोग्य अधिकारी (सीएचओ) व वैद्यकीय अधिकारी नसल्याने नसल्यामुळे रुग्णांना खाजगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागत आहे.

तालुक्यातील वडगाव, सुपने, काले, सैदाशिवगड व मसूर परिसरातील अनेक उपकेंद्रांमध्ये डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. गोळेश्वर, कापील, दुशेरे, कोरेगाव, करवडी, तांबवे, आरेवाडी, आटके, चोरे, वहागाव, साळशिरंबे, ओंड, सवादे आदी गावांतील ग्रामस्थांना याचा मोठा फटका बसत आहे. अनेक ठिकाणी नियमित तपासणी, गर्भवती महिलांची आरोग्य सेवा, लसीकरण तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या तपासण्या विस्कळीत झाल्या आहेत.

डॉक्टरांविना असलेली उपकेंद्र गोळेश्वर, कापील, दुशेरे, कोरेगाव, करवडी, तांबवे, आरेवाडी, आटके, चोरे,

कराड तालुक्यात ग्रामीण रुग्णालय १, प्राथमिक आरोग्य केंद्र १३, आरोग्य उपकेंद्र ६५ आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून तालुक्यातील प्रत्येक गावात आरोग्य सेवा दिली जात आहे. काही उपकेंद्रांमध्ये डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. त्याबाबत पत्रव्यवहार झालेला आहे. नविन पदभरती झाली नसल्यामुळे डॉक्टरांची कमतरता असून वरिष्ठ पातळीवर त्यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे.
**– नरेंद्र माळी, तालुका आरोग्य अधिकारी**

आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून ग्रामीण विभागाला आरोग्य सेवा उपलब्ध होतात. ग्रामीण भागातील बहुतांश जनता आरोग्य सेवेसाठी या केंद्रांवरच अवलंबून असते. मात्र, सध्या तालुक्यातील तेरा उपकेंद्रात डॉक्टर नसल्यामुळे रुग्णांना खासगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागत आहे. शासनाने तातडीने डॉक्टरांची नेमणूक करावी.
**– संग्रामबाबा पवार, पंचायत समिती सदस्य, कराड**